# संपादकीय

## उम्मीद पर दुनिया कायम है

राजकारणातील किंवा सत्ताकारणात महिलांचा सहभाग हा सामाजिक चर्चेचा आणि समाजमाध्यमांवर काहीसा थट्टेचा विषय आढळतो. या मुद्याला धरून खिल्ली उडवणारा मजकूर किंवा चित्रे या माध्यमांवर फिरतात. काही विषय चर्चेसाठी कालातीत असावेत. उपरोक्त मुद्दा त्यातीलच एक असावा. एकविसाव्या शतकातही हा चर्चेचाच मुद्दा आहे यातच सगळे काही आले. तथापि महिलांना संधी मिळाली की त्या प्रभावी काम करून दाखवू शकतात हे देशाच्या १०५ गावांमधील सुमारे १३० महिलांनी प्रत्यक्ष कृतीतून दाखवले. एका सामाजिक संस्थेने या महिलांना सूर्यप्रकाशावर चालणारे दिवे (सोलर लाईट) घरावर बसवण्याचे प्रशिक्षण दिले. या महिलांनी सुमारे सव्वाशे गावांमधील घरांवर तसे दिवे बसवले. यात काही बिघाड झाल्यास त्याच महिला दुरुस्ती देखील करतात. त्यांच्या या कार्यामुळे अनेक घरांमध्ये पहिल्यांदाच वीज पोहोचली. त्यांची कथा माध्यमात नुकतीच प्रसिद्ध झाली. विदर्भातील तीन महिलांनी त्यांच्या गाव परिसरातील तलाव पुनरुज्जीवित केले. दैनंदिन जीवनात महिलांना अनेक समस्यांशी झुंजावे लागते. पाणीटंचाई, दुष्काळ, महागाई, भारनियमन, खराब रस्ते अशा अनेक सामाजिक समस्यांचे दुष्परिमाण महिलांनाच जास्त सोसावे लागतात. त्यांना त्या समस्यांची जाणीव असते. त्या समस्यांचा सामना करण्याची किंवा त्यावर उपाय शोधू शकण्याची क्षमता महिलांमध्ये असू शकते. त्यांना संधी मिळाली तर त्या सिद्धही करू शकतात. केवळ उपरोक्तच नव्हे तर विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून महिला तसा अनुभव समाजाला देतात. तथापि समाजात त्यांच्याबाबतीत केला जाणारा भेदभाव हा त्यातील एक मुख्य अडथळा मानला जातो. त्यांना नेहमीच गृहीत धरले जाते. निर्णयप्रक्रियेत त्यांचा सहभाग अजूनही नाकारला जातो. प्रत्यक्ष व्यवहारात 'त्यांना काय समजते.. ते त्यांचे काम नाही..त्यांनी स्वयंपाक करावा.. नको ती स्वप्ने बघू नयेत' असेच त्यांना सतत ऐकवले जाते. तरीही अनेक महिला उमेद हारत नाहीत. अनेकजणी भेदभावाला आणि दुजाभावाला पुरून उरतात. असा अनेकींनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाने त्यांची दखल घेण्यास भाग पाडले आहे. राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियानांतर्गत अनेक योजना राबवल्या जातात. त्यातून बचतगटांना पाठबळ दिले जाते. त्याचा फायदा महिलांचे अनेक बचत गट घेताना आढळतात. तात्पर्य, विविध पातळ्यांवर महिलांचा सहभाग आश्वासकता वाढवू शकतो. यामुळे 'उम्मीद पर दुनिया कायम है' हा आशावाद यामुळे समस्त महिलांच्या मनात निर्माण होऊ शकेल.

# पोलीस निरीक्षक जोंधळे यांच्यासमोर गुन्हेगारी रोखण्याचे आव्हान



**राहाता (वार्ताहर)**– राहाता पोलीस ठाण्यात नव्याने रूजू झालेले पोलीस निरीक्षक अरविंद जोंधळे यांच्यापुढे राहाता शहरासह परीसरातफोफावलेली गुन्हेगारी रोखण्याचे मोठे आव्हान आहे.

पोलीस निरीक्षक सोपानराव काकड यांची मुंबई येथे बदली झाली. त्यांच्या जागी पोलीस निरीक्षक अरविंद जोंधळे यांची नियुक्ती झाली आहे. शहर व परिसरात वाढती गुन्हेगारी रोखण्याचे जोंधळे यांच्यासमोर आव्हान आहे. राहाता पोलीस ठाण्यांतर्गत पुणतांबा आऊटपोस्ट आहे. या पोलीस ठाण्याला १ पोलीस निरीक्षक, २ उपनिरीक्षक व ३५ पोलीस कर्मचारी असून राहाता पोलीस ठाण्याच्या देखरेखीखाली २० गावांचा कारभार आहे. या पोलीस ठाण्याअंतर्गत वाढत असलेली गुन्हेगारी पोलिसांना मोठी डोकेदुखी ठरत आहे. गावठी कट्टा बाळगणे, गंठण व वाहन चोरी, दुकान व घरफोडी, वाळू तस्करी, मटका जुगार, अवैध दारू व गुटखा विक्री, वाहतूक कोंडी अशा प्रकारच्या वाढत असलेल्या गुन्हेगारीमुळे नागरिकांचा सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे. रोडरोमिओंचा शालेय तसेच महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना होणारा त्रास रात्रीच्यावेळी बस स्थानक, छत्रपती शिवाजी महाराज कॉम्प्लेक्स, शनि महाराज चौक, कोपरगाव नाका परिसर, आंबेडकर चौक, जुने पोस्ट ऑफिस जवळील चौक या ठिकाणी अनेक टारगट तरुण दारूच्या नशेत आरडाओरडा करून स्थानिक नागरिकांना त्रास देतात. तसेच पोलीस ठाण्यांतर्गत असणाऱ्या गावात अनेक ठिकाणी विनापरवाना हातभट्टी व देशी दारूची सर्रास विक्री केली जाते. अनेक हॉटेलमध्ये सर्रासपणे दारूची विक्री होताना दिसते. अवैधरित्या होणाऱ्या मद्य विक्रीमुळे मद्यपींचा शेजारी राहणाऱ्या नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. गुटखा विक्रीचे मोठे रॅकेट कार्यरत आहे. राहाता बाजार तळ तसेच इतर गावांमध्ये सर्रास पत्त्यांचे क्लब व जुगार सुरू आहे. वाहतूक शाखेच्या दुर्लक्षामुळे गुरुवारी आठवडे बाजारात नगर मनमाड रस्त्यावर वीरभद्र मंडळासमोर वाहतुकीची कोंडी पाहाव्यास मिळते. वाहतूक शाखेचे पोलीस कधीच या ठिकाणी हजर नसतात. अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या रिक्षा व इतर वाहनांवर कारवाई करण्याऐवजी वाहतूक पोलीस शिर्डी शिंगणापूर जाणाऱ्या साई भक्तांच्या वाहने तपासण्यात मग्न दिसतात. अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या ॲपे रिक्षा तसेच इतर वाहन चालकांकडे वाहन चालवण्याचा परवाना नाही १८ वर्षांखालील अनेक तरुण नियम धाब्यावर बसवून वाहन चालवताना दिसतात. परिणामी त्यांच्या चुकीमळे अनेक प्रकारचे अपघात घडून नागरिकांना जीव गमवावा लागतो. प्रत्येक गावात तसेच शहरात रात्रीच्या वेळी चौकात व रस्त्याच्या मध्यभागी युवक वाढदिवस साजरा करण्यासाठी विना परवाना डीजेचा आवाज मोठा करून व फटाक्यांची आतषबाजी करतात त्यामुळे नागरिकांची झोप उडते. महाविद्यालय तसेच शाळा सुरू होण्यापूर्वी व सुटल्यानंतर वाहतूक शाखेच्या पोलिसांनी त्याठिकाणी हजर राहणे गरजेचे असताना देखील याठिकाणी हजर राहत नसल्यामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात होताना दिसते. आशा वाढत्या गुन्हेगारीला नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक अरविंद जोंधळे पाय बंद घालतील का? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

# तरुणीचे अपहरण करणाऱ्यांना अटक करा

## ...अन्यथा सकल हिंदू समाजाच्यावतीने जनआक्रोश मोर्चाचा इशारा

**संगमनेर (शहर प्रतिनिधी)**– तालुक्यातील आंबीखालसा येथील एका तरुणीचे अपहरण करण्यात आले आहे. या तरुणीचे अपहरण करणाऱ्या आरोपींना दोन दिवसांत अटक करून त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करवी. अन्यथा पठारभागातील सकल हिंदू समाजाच्यावतीने जनआक्रोश मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा सकल हिंदू समाजाने दिला आहे.

याबाबत घारगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन देण्यात आले आहे. त्यात म्हटले आहे, की आंबीखालसा येथील एका मुलीचे अपहरण करण्यात आले आहे. शादाब रशीद तांबोळी, लाहीर शेख, जावेद शेख, कुणाल विठ्ठल शिरोळे यांनी ७ जुलै, २०२४ रोजी सकाळी साडेअकरा वाजेच्या सुमारास घारगाव बसस्थानक परिसरातून तरुणीचे अपहरण केले आहे. संघटितपणे हा गुन्हा केला आहे. त्यांचा म्होरक्या युसूफ चौगुले नावाचा इसम असून हा व्यक्ती तरुणांना गुन्हेगारीस प्रवृत्त करत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. पठारभागातील काही तरुण सर्रासपणे गावठी कट्टे वापरतात. त्यांच्याविरुद्धही कारवाई करण्यात यावी. अपहरण झालेल्या तरुणीचा त्वरीत शोध घेऊन तिचे अपहरण करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करावी. पोलिसांनी याबाबत कारवाई न केल्यास सकल हिंदू समाजाच्यावतीने जनआक्रोश मोर्चा काढून घारगाव येथे रास्ता रोको आंदोलन करण्यात येईल, असा इशारा सकल हिंदू समाजाच्यावतीने देण्यात आला आहे. या निवेदनावर बजरंग दलाचे कुलदीप ठाकूर, बबन शेळके यांच्या सह्या आहेत.

### बेपत्ता झालेल्या मुलीचा शोध घेऊ -वाघचौरे

- आंबीखालसा येथील १९ वर्षांची तरुणी बेपत्ता झाली असल्याच्या वृत्ताला उपविभागीय पोलीस अधिकारी सोमनाथ वाघचौरे यांनी दुजोरा दिला आहे. या तरुणीबाबत घारगाव पोलीस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आलेली आहे. याबाबत निवेदनही प्राप्त झाले आहे. त्यानुसार सदर तरुणी ज्या तरुणासोबत गायब झाली आहे त्याच्या कुटुंबियांना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलावले होते. पोलीस तिचा निश्चितपणे शोध घेतील,असे वाघचौरे यांनी सांगितले.

# शहरातील अवैध व्यवसायाविरोधात मनसेचे आंदोलन सुरू




**श्रीरामपूर (प्रतिनिधी)**– शहर पोलीस स्टेशन हद्दीतील अवैधरित्या चालू असलेले क्लब व मटका त्वरीत बंद करून चालक-मालक यांच्याविरुद्ध कठोर कार्यवाही करण्यात यावी या मागणीसाठी मनसेच्यावतीने उपोषण सुरू करण्यात आले आहे. सदरचे व्यवसाय बंद होऊन कारवाई केली जात नाही तोपर्यंत उपोषण सुरूच ठेवण्याचा निर्धार मनसेचे बाबा शिंदे यांनी केला आहे.

शहरामध्ये तसेच बेलापूर गावामध्ये पत्त्याचे क्लब सर्रास सुरू आहेत. शहरातील प्रत्येक गल्लीबोळ्यामध्ये खुलेआम टपऱ्यांमध्ये व आडोशाला मुंबई कल्याण मटका नावाचा अवैध व्यवसाय सुरू आहे. यात पैशाचे आमिष दाखवून पैसे खेळण्यास भाग पाडून हजारो लोकांना देशोधडीला लावले जात आहे. या अवैधरीतीने चालणाऱ्या व्यवसायाकडून नागरिकांना त्रास होत आहे. पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन देऊन कारवाई करण्यात यावी, अशी मागणी केली होती. परंतु आमच्या निवेदनाची दखल न घेतल्याने गांधी पुतळ्यासमोर उपोषण सुरू केले आहे. नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या पत्त्याचे क्लब मालक व मटका मालक यांच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा निर्धार शिंदे यांनी केला आहे. दोन ते तीन दिवसांत उपोषणाची दखल न घेतल्यास नगर जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते जेलभरो आंदोलन करतील असा इशारा यावेळी दिला आहे.

यावेळी मनसे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, प्रविण रोकडे, विलास पाटणी, डॉ.संजय नवथर, सतीश कुदळे, गणेश दिवसे, नितीन जाधव, अमोल साबणे, निलेश सोनवणे आदी उपस्थित होते.

## आमदार काळेंच्या पाठपुराव्याला यश

# तिळवणी प्राथमिक आरोग्य केंद्रास मान्यता



**कोपरगाव (प्रतिनिधी)**– कोपरगाव मतदार संघाच्या पूर्व भागातील नागरिकांच्या आरोग्याच्या समस्या कायमच्या सोडविण्यासाठी तीळवणी प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजुरी मिळावी यासाठी पाठपुरावा सुरू होता. त्या पाठपुराव्याला अखेर यश आले असून तीळवणी प्राथमिक आरोग्य केंद्रास महायुती शासनाने मंजुरी दिली असल्याची माहिती आमदार आशुतोष काळे यांनी दिली.

कोपरगाव मतदार संघाच्या सीमेवरील असलेल्या तीळवणी लगतच्या गावातील नागरिकांना आरोग्याच्या सोयी सुविधा मिळाव्यात यासाठी तीळवणी याठिकाणी प्राथमिक आरोग्य केंद्र होणे गरजेचे होते. त्याबाबत तीळवणी प्राथमिक आरोग्य केंद्रास जिल्हा नियोजन बैठकीत मान्यता देण्यात आली होती. मात्र जिल्हा नियोजन समितीची मान्यता मिळाल्यानंतर मंत्रालय स्तरावर मान्यता मिळणे आवश्यक होते व त्यांनतरच निधीची तरतूद होणार असल्यामुळे आरोग्य विभागाकडे पाठपुरावा सुरूच होता. त्या पाठपुराव्याची दखल घेऊन महायुती शासनाने तीळवणी प्राथमिक आरोग्य केंद्रास मंजुरी दिली असल्याचे आ. काळे यांनी सांगितले.

पूर्व भागातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले असून त्यांनी आ. आशुतोष काळे यांचे आभार मानले आहे. तिळवणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या माध्यमातून तिळवणीसह कासली, शिरसगाव, आपेगाव, उक्कडगाव, सावळगाव, गोधेगाव, घोयेगाव आदी कोपरगाव तालुक्यातील गावांसह वैजापूर तालुक्यातील नजीकच्या गावातील नागरिकांचे आरोग्य आबाधित राहण्यासाठी मोठी मदत होणार आहे.

# पिंपरी निर्मळ येथील चिरेखन वस्ती, पोकळे वस्ती, देसाई वस्ती रस्त्यांविना



**पिंपरी निर्मळ (वार्ताहर)**– राहाता तालुक्यातील कोल्हार कोपगाव महामार्गावर असलेल्या पिंपरी निर्मळ गावातील अंतर्गत शिवार वाहतुकीचे रस्ते जवळपास बंद पडले आहेत. येथील पोकळे वस्ती देसाई वस्ती तसेच चिरेखन रोडला राहणारे नागरिक यांचे रस्ते बंद झाल्याने या रहिवाशांचा व शेतकऱ्यांचा रस्त्याचा प्रश्न बिकट झालेला आहे. महसूल विभाग मात्र केवळ कागदी घोडे नाचवण्यात दंग असून यावर तातडीने उपाययोजना कराव्यात अशी मागणी या भागातील रहिवाशांमधून होत आहे.

राहाता तालुक्यातील गणेश परिसरातील पिंपरी निर्मळ गाव शेती क्षेत्र तसेच शिवाराने मोठे आहे. गावाचे दोन दिशेचे अंतर जवळपास सहा किलोमीटर आहे. महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली गावाला जोडणारे सर्वच रस्ते डांबरी व पक्के झालेले आहेत. मात्र शिवार वाहतुकीचे रस्ते वादात अडकल्याने या भागातील शेतकऱ्यांचे व रहिवाशांचे प्रचंड हाल होत आहेत. अगदी गेल्या चार चार वर्षापासून महसूल विभागाला वारंवार अर्ज देऊन पाठपुरावा करूनही या रस्त्यांचा श्वास मोकळा झालेला नाही. गावातील पोकळे वस्तीला जाणारा शिवरस्ता पिंपरी निर्मळ लोणी खुर्दच्या शेतकऱ्यांच्या वादात रखडला आहे. तर देसाई वस्तीकडे जाणारा रस्ताही येथील शेतकऱ्यांच्या वादामुळे बंद पडलेला आहे. तर जुना पिंपरी निर्मळ बाभळेश्वर चिरेखन रोड ४०० केव्ही सब स्टेशनने गिळंकृत केल्याने बंद झाल्यात जमा आहे. मात्र यामुळे या परिसरातील रहिवाशांचे व शेतकऱ्यांचे प्रचंड हाल होत आहेत. विद्यार्थी आबालवृद्ध महिला शेतकरी यांना जाण्याकरिता मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे.पाऊस पडल्यावर तसेच सोंगणीच्या वेळेला शेतात ट्रॅक्टर कसा व कोठून न्यायचा असा बिकट प्रश्न या शेतकऱ्यांसमोर तयार झालेला आहे. त्यामुळे शेतातील तयार शेतमाल बाहेर काढणे अवघड होत आहे. असे होत असल्याने या भागातील रहिवाशांचे, शेतकऱ्यांचे प्रचंड मोठे आर्थिक नुकसान होत आहे. या रस्त्यांचा श्वास मोकळा व्हावा यासाठी येथील शेतकऱ्यांनी वारंवार महसूल विभागाकडे कागदपत्रे करून पाठपुरावा केलेला आहे. मात्र महसूल विभाग केवळ कागदोपत्री घोडे नाचवण्यात धन्यता मानत असल्याने गेल्या अनेक वर्षापासून हे रस्ते बंद होवून पडलेले आहेत.

शिवार रस्ते खुले करण्यासाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात निधीची तरतूदही करण्यात आलेली आहे. मात्र महसूल विभागाच्या दुर्लक्षामुळे येथील रहिवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. महसूल विभागाने तातडीने पावले उचलून या तीनही रस्त्यांचा श्वास मोकळा करावा व येथील रहिवाशांना हक्काचा शिवाररस्ता काढुन द्यावा, अशी मागणी येथील शेतकरी वर्गातून होत आहे.

# चाईल्ड करिअर ज्युनिअर कॉलेजमध्ये वृक्षारोपण



**सलाबतपूर (वार्ताहर)**– येथील चाईल्ड करिअर इंग्लिश मीडियम स्कूल अँण्ड ज्युनियर कॉलेजमध्ये इयत्ता अकरावी विज्ञान शाखेच्या वर्गाचा प्रवेशित विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या हस्ते वृक्षारोपण करून पहिल्या दिवसाची सुरुवात करण्यात आली.वृक्ष हे निसर्गाचा महत्वाचा घटक आहेत. वृक्ष हे संपूर्ण सजीव सृष्टीला संतुलित ठेवतात .म्हणून वृक्ष चळवळ उभी रहावी, असे प्रतिपादन संस्थेचे संस्थापक अध्यक्ष श्री. सागर बनसोडे यांनी केले. २०२४ -२५ बॅचचे अकरावी विज्ञान वर्गाच्या पहिल्या दिवशी वृक्षारोपण करण्यात आले. ज्युनिअर कॉलेजचा लौकिक असल्याने अनेक विद्यार्थी अकरावी व बारावी विज्ञान शाखेसाठी विद्यार्थी प्रवेश घेत आहेत, अशी माहिती प्राचार्य रवींद्र गावडे यांनी दिली. सदर कार्यक्रमास गोविंद औताडे, कैलास तांबे, संजय गरुटे, संतोष निकम यांचेसह पालक, शिक्षक उपस्थित होते.

# बेलापूर महाविद्यालयात सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन



**बेलापूर (वार्ताहर)**– येथील कला, वाणिज्य महाविद्यालयात वाड्.मय, वाणिज्य व सांस्कृतिक मंडळाचे उद्घाटन तसेच स्वागत कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी अध्यक्षस्थानी सचिव ॲड. शरद सोमाणी होते. पोलीस अधिकारी सुरेश आव्हाड, सुधीर हापसे, संस्थेचे विश्वस्त ॲड. विजय साळुंके, शेखर डावरे, शिक्षक प्रतिनिधी प्रा.नामदेव मोरगे, सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. विठ्ठल सदाफुले, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.प्रकाश देशपांडे, वाणिज्य मंडळाचे अध्यक्ष डॉ.अशोक माने, वाड्.मय मंडळाचे डॉ.मनोज तेलोरे उपस्थित होते. यावेळी ॲड. शरद सोमाणी, ॲड. विजय साळुंके, प्राचार्या डॉ. गुंफा कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ग्रंथालयाचा वापर करून त्याद्वारे विविधांगी साहित्य तसेच कायदेविषयक वाचन करावे, महाविद्यालयात असलेल्या शैक्षणिक शाखांचा उपयोग करून व्यक्तिमत्वाचा विकास करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमात मीनल शेलार व श्रुती सराफ यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सुवर्णपदक प्राप्त केल्याबद्दल सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक डॉ.मनोज तेलोरे यांनी केले तर प्रा.प्रकाश देशपांडे यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी -विद्यार्थिनी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.अशोक माने यांनी केले.


# खुडसरगाव सोसायटीच्या अध्यक्षपदी देठे; उपाध्यक्ष गोसावी

**आरडगाव (वार्ताहर)**– राहुरी तालुक्यातील खुडसरगाव विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदी भाऊसाहेब रामचंद्र देठे व उपाध्यक्षपदी मच्छिंद्र गोपाळपुरी गोसावी यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.

श्री काळभैरव शेतकरी मंडळाचे अध्यक्ष सचिन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड बैठक सोसायटीच्या सभागृहात आयोजित करण्यात आली. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून एम.ए. शेख यांनी काम पाहिले. संस्थेचे सचिव अण्णासाहेब जाधव, बाळासाहेब पवार व गणपत निशाणे यांनी सहाय्य केले. भाऊसाहेब देठे यांना अध्यक्षपदासाठी सूचक ज्ञानेश्वर पवार तर त्याला अनुमोदन राजू क्षीरसागर यांनी दिले तसेच उपाध्यक्षपदी मच्छिंद्र गोसावी यांना सूचक मच्छिंद्र निशाणे तर अनुमोदन वामन पवार यांनी दिले. यावेळी प्रमोद पवार, ज्ञानेश्वर पवार, बाळकृष्ण पवार, नानासाहेब पवार, सोमनाथ देठे, योगीता पवार, ताराबाई पवार, आदी संचालकासह सभासद व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# उदय गवांदेंची नामांकित कंपनीत सिनिअर डायरेक्टरपदी निवड



**संगमनेर (प्रतिनिधी)**– येथील सह्याद्री ज्युनिअर कॉलेजचा माजी विद्यार्थी उदय बाबुराव गवांदे यांची जर्मनीमधील नामांकित विभागामध्ये सिनिअर डायरेक्टर म्हणून निवड झाली. या यशाबद्दल त्यांचा सह्याद्री संस्थेचे अध्यक्ष तथा माजी आमदार डॉ. सुधीर तांबे यांच्याहस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी उदय गवांदे यांनी ज्युनिअर कॉलेजला १ लाख ५१ हजार रुपयांची देणगी दिली.

सह्याद्री संस्थेत झालेल्या सत्कार प्रसंगी सहसचिव दत्तात्रय चासकर, रजिस्ट्रार बाबुराव गवांदे, डॉ.राजेंद्र खताळ, प्राचार्य के. जी. खेमनर, डॉ. बाळासाहेब वाघ, अद्वय गवांदे आदींसह विविध मान्यवर उपस्थित होते. उदय यांचे शिक्षण बी. ई. (मेकॅनिकल), एम. बी. ए., एम. टेक असून त्यांचे मूळ गाव अकोले तालुक्यातील चैतन्यपूर आहे. सह्याद्री संस्थेचे रजिस्ट्रार बाबुराव गवांदे यांचे ते सुपुत्र आहेत. त्यांनी जनरल मॅनेजर भारत फोर्ज कल्याणी ग्रुप पुणे येथे डायरेक्टर, सप्लाय चेन सेनविऑन विंड टेक्नॉलॉजी मुंबई येथे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून तर एनरकॉन विंड एनर्जी बंगलोर येथे कार्यकारी अधिकारी अशा विविध महत्त्वाच्या पदावर त्यांनी काम केलेले असून आता त्यांची जर्मनीमध्ये ग्लोबल सप्लाय लाईन मॅनेजमेंट या विभागामध्ये सिनिअर डायरेक्टर म्हणून निवड झाली आहे. या घवघवीत यशाबद्दल भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री ज्युनिअर कॉलेजच्यावतीने त्यांचा यथोचित सन्मान करण्यात आला. या यशाबद्दल माजी मंत्री, आमदार बाळासाहेब थोरात, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, दुर्गा तांबे, आमदार सत्यजीत तांबे, डॉ. जयश्री थोरात, इंद्रजीत थोरात, संस्थेचे सचिव लक्ष्मण कुटे, सहसचिव दत्तात्रय चासकर, चंद्रकांत कडलग, प्राचार्य के. जी. खेमनर, उपप्राचार्य संजय सुरसे आदींनी अभिनंदन केले आहे. सूत्रसंचालन शिक्षक प्रतिनिधी प्रा. गणेश गुंजाळ यांनी केले तर आभार प्रा. एन. एस. गुंड यांनी मानले.